# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ०२/०८/२०२४ (शुक्रवार) सायंकाळ**

---

## पो.स्टे. देवलापार हद्दीमधील जुगार अड्डयावर धाड
## —: नागपुर ग्रामीण पोलीसांची कारवाई :—

दिनांक ३१/०७/२०२४ रोजी पोस्टे देवलापार येथील स्टाफ पोस्टे हद्दीत पेट्रोलिंग करीत असतांना गोपनीय माहिती मिळाली की, पोलीस स्टेशन देवलापार हद्दीतील मौजा बोथीया पालोरा येथे काही इसम ५२ तासपत्त्यावर पैशाची बाजी लावुन हारजीतचा जुगार खेळत असल्याची गोपनिय माहीती प्राप्त झाले वरून सदर पथकाने मौजा बोथीया पालोरा येथे सापळा रचुन छापा टाकुन **आरोपी नामे—१) रामाजी रेमाजी कुंभरे वय ४५ वर्ष, २) निताराम भ्मिराव उईके, वय ५५ वर्ष, ३) प्रितम रूपचंद भलावी वय २० वर्ष, ४) दिपक महेंद्र चौकसे वय २३ वर्ष, ५) विवेक रामुदास मरस्कोल्हे वय २० वर्ष, ६) कुणाल पप्पु उईके वय १८ वर्ष, ७) श्याम रूपचंद अडमाची वय ३८ वर्ष सर्व रा. बोथीया पालोरा** हे जुगार खेळतांनी मिळुन आले. एकुण ०७ जुगारी इसम यांना ताब्यात घेवुन आरोपीतांकडुन ५२ ताशपत्ते व नगदी १५५०/— रू. चा मुद्देमाल जप्त करून आरोपीतांविरूध्द पोलीस ठाणे देवलापार कलम १२ महाराष्ट्र जुगार अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण श्री. हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनात पोस्टे देवलापार येथील ठाणेदार सपोनि राजेश पाटील यांचे नेतृत्वात पोअं. विष्णु लहाने यांनी पार पाडली.

## पोस्टे रामटेक हद्दीत सट्टापट्टी लिहणाऱ्या आरोपीविरूद्ध कारवाई

दिनांक ३१/०७/२०२४ रोजी पोस्टे रामटेक येथील स्टाफ पोस्टे हद्दीत पेट्रोलींग करीत असता गोपनीय माहिती मिळाली की, मौजा आमडी येथे नरेश कोजरे नावाचा इसम आमडी गावातील समाजभवन जवळ चिंचाच्या झाडाखाली बसुन कागदावर वरली मटक्याचे आकडे लिहुन सट्टीपट्टी चालवित आहे. अशा माहिती वरून रेड केली असता वरली मटका सट्टापट्टी चालविणारा **आरोपी नामे— नरेश जगद कोजरे, रा. मनसर** याची अंगझडती घेतली असता त्याचे ताब्यातून १) एक वरली मटका सट्टापट्टीचे आकडे लिहीलेला चिटोरा (२) एक निळया शाईचा पेन किंमती ०३/—रू. ३) कार्बन पेपर चिटोरा (४) नगदी ९७७/— रू असा एकुण ९८०/—रू मुद्देमाल जप्त करून आरोपीविरूद्ध कलम १२ अ महाराष्ट्र जुगार अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण श्री. हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनात पोस्टे रामटेक येथील ठाणेदार पोनि. प्रशांत काळे, पोना संदीप धुर्वे, पोअं. रूपेश राठोड, रामप्रसाद भलावी यांनी पार पाडली.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर